# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

### राष्ट्रीय सेवा योजना विभाग



बहिवाडी येथे स्मशानभूमीत स्वच्छता करताना विद्यार्थी.

# राजगुरु महाविद्यालयाचे एनएसएस शिबिर उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**चासकमान :** बहिरवाडी (ता. खेड) येथे खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरु महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे-पाटील महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर झाले. त्यामध्ये सुमारे २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

बहिरवाडीमध्ये घेण्यात आलेल्या शिबिराचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष प्रतापराव टाकळकर यांच्या हस्ते झाले. आयोजित करण्यात आलेल्या शिबिरामध्ये विद्यार्थिनी ग्रामस्वच्छता, गट चर्चा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, पारंपरिक वेषभूषा, वनराई बंधारे, सर्वेक्षण, वृक्षारोपण, पर्यावरण रक्षण, श्रमसंस्कार, व्यसनमुक्ती, एक भारत श्रेष्ठ भारत, हळदी-कुंकू हिमोग्लोबिन तपासणी, जनजागृती सांस्कृतिक कार्यक्रमातून प्रबोधनपर, ग्रामस्वच्छता आदी सह विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. ग्रामीण भागांत राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास व्हावा ग्रामीण भागातील परंपरा ग्रामीण भाग गावातील जनजीवन यांचा विद्यार्थ्यांना जवळून परिचय व्हावा म्हणून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना शिवव्याख्याते संपत गारगोटे, पोलीस उपनिरीक्षक भूषण सांडभोर, अविनाश कोहिणकर, नरेश हेडा, मुरलिधर थिगळे, संजय शिंदे, मिलिंद आहेर, अमित टाकळकर, अजय टाकळकर, यांचे व्याख्यान झाले. या वेळी मच्छिंद्र मुळुक, अतुल पोखरकर, सुप्रिया राक्षे, सदाशिव उलागंडे, शीतल वाघमारे, नीता डोंगरे, योगेश वाळुंज, गणेश धुमाळ, दिलीप मुळूक यांनी नियोजन केले. प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, शिल्पा जगताप, उपप्राचार्य संजय शिंदे, डॉ. व्ही. डी कुलकर्णी, के. आर. पाचारणे यांनी मार्गदर्शन केले. शिबिरासाठी सरपंच जगन्नाथ राक्षे, बारक वाघोले यांनी सहकार्य केले.

दै. लोकमत

सकाळ

# बहिरवाडीत स्वच्छतेबरोबर जनजागृती

## हुतात्मा राजगुरू व साहेबराव बुट्टे महाविद्यालयांचे श्रमसंस्कार शिबिर

चास, ता. २ : बहिरवाडी (ता. खेड) येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर उत्साहात झाले. या शिबिरात शिबिरार्थींनी विविध उपक्रम राबवत परिसरात स्वच्छतेबरोबरच जनजागृती केली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबराव बुट्टे पाटील महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर बहिरवाडी येथे २० ते २६ डिसेंबर दरम्यान झाले. 'सक्षम युवा व समर्थ भारत' अभियान ही संकल्पना असलेल्या या शिबिरात २१० विद्यार्थी सहभागी झाले होते. या शिबिरात ग्रामस्वच्छता, शाळा परिसर सपाटीकरण करणे, ठाकरवाडी, स्मशानभूमीची स्वच्छता व परिसर सुशोभीकरण करण्याबरोबरच ओढ्याच्या पात्रात दोन वनराई बंधारे बांधण्यात आले. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, अंकुश राक्षे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचा प्रारंभ व समारोप करण्यात आला.

शिबिरात संपत गारगोटे, नरेश हेडा, अविनाश कोहिनकर, भूषण सांडभोर, डॉ. संजय शिंदे, मुरलीधर थिगळे, मिलिंद आहेर, अजित टाकळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तर डॉ. शरद वाडिले व अल्ताफ पठाण यांनी शिबिरार्थींची एड्स चाचणी केली. डॉ. गोरे यांच्या माध्यमातून गावातील महिलांची हिमोग्लोबिन चाचणी करण्यात आली. या वेळी विद्या टोंबरे हिने कीर्तन सादर केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सरपंच जगन्नाथ राक्षे, उपसरपंच बारकू वाघुले, ग्रामपंचायत सदस्य तसेच सर्व ग्रामस्थ, डॉ. विशाल गायकवाड, विजयसिंह शिंदे, बाळासाहेब सांडभोर, डॉ. एन. एल. जरे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. संजय शिंदे, व्ही. डी. कुलकर्णी, कैलास पाचारणे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. नीता डोंगरे, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. शीतल वायकर यांनी विशेष परिश्रम घेतले.



बहिरवाडी (ता. खेड) : ओढ्याच्या पात्रात श्रमदानातून वनराई बंधारा बांधताना राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिरार्थी.

Pune, District Today
03/01/2020 Page No. 6

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख